सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

ई-मेल - sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in


## पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ

## कृषि, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग जाहिरात क्रमांक ३५ /२०१४

## धारिका क्रमांक : १९४(i)(ii)(४७)/१७५९८/पंधरा-अ

**आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ (Livestock Development Officer, Maharashtra Animal Husbandry Services, Gr.A)** पदावरील भरतीसाठी **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| एकूण पदसंख्या | | अराखीव | अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे ३७२ | सर्वसाधारण | १७२ | २१ | १५+२५▼ | ७+४▼ | ३ | १ | ५ |
| | महिला * | ७९ | १० | ७ | ३ | १ | --- | २ |
| | खेळाडू ☑ | १३ | २ | १ | १ | --- | --- | --- |
| | एकूण | २६४ | ३३ | ४८ | १५ | ४ | १ | ७ |
| | विकलांग | एकूण ३७२ पदांपैकी ५० पदे विकलांगासाठी आरक्षित. (२५ पदे श्रवण शक्तीतील दोष व २५ पदे चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायुसाठी आरक्षित) विकलांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास विकलांगासाठी आरक्षित असलेली पदे खुल्या प्रवर्गामधून रिक्त ठेवण्यात येतील. | | | | | | |

*** उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित ☑ उपलब्ध असल्यास खेळांडूसाठी आरक्षित ▼ अनुशेषाचे पद**

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ शासन निर्णय, कृषि, पशुसवंर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पसंप्र २०११/ प्र.क्र.४/ पदुम-१ दिनांक १० जानेवारी, २०१२ अनुसार प्रस्तुत पदासाठी श्रवण शक्तीतील दोष ( Hearing Impairirment) व चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु ( Locomotor Disability or Cerebral Palsy) असे विकलांत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत. तथापि, अंधत्व किंवा क्षीणदृष्टी ( Blindness or Low Vision) असे विकलांत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास अपात्र आहेत.

२.३ वि.जा. (अ), भ.ज. (ब) व भ.ज. (ड) या वर्गवारीसाठी आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास महाराष्ट्र राज्य लोकसेवा अधिनियम, २००१ मधील अंतर्गत परिवर्तनीयतेच्या तरतुदीनुसार सदर पदे वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) या वर्गवारीतील उमेदवारांचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

**३. वेतनश्रेणी**:- रु.१५,६००-रु.३९,१०० + ग्रेड पे रु. ५,४००/-

**४. पात्रता**:- उमेदवार भारतीय नागरिक असावा.

**४.१ वय:- दिनांक १ जून,२०१४ रोजी वय ३३ वर्षे व मागास वर्गवारीकरीता ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

४.२ शासन आदेशानुसार अपंग, माजी सैनिक व खेळाडू इत्यादींसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

४.३ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अपवादात्मक अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोगाकडून विचार करण्यात येईल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेच्या सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

**४.४ शैक्षणिक अर्हता :-**

(१) ' पशुवैद्यकशास्त्र ' किंवा ' पशुवैद्यकशास्त्र व पशुसंवर्धन ' यामधील पदवी.

(२) राज्य पशुवैद्यक / भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ नुसार नोंदणी असणे आवश्यक असून त्यामध्ये नोंदणी केलेला नोंदणी क्रमांक अर्जामध्ये नमूद करावा.

४.५ प्रस्तुत पदास व्यवसाय भत्ता अनुज्ञेय नाही. तसेच खाजगी व्यवसाय करण्यास परवानगी नाही.

४.६ परिविक्षा कालावधी २ वर्षाचा राहील.

**५. निवडीची पध्दत**

**५.१ प्रस्तुत पदासाठी वस्तुनिष्ठ स्वरुपाची लेखी परीक्षा आणि मुलाखत अशा दोन टप्यामध्ये सदर भरती प्रक्रिया घेण्यात येणार आहे. त्या करीता दिनांक ०६ एप्रिल, २०१४ रोजी केवळ मुंबई केंद्रावर सर्व उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षा घेण्यात येणार असल्यामुळे जाहिरातीतील विहित मूळ अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. सदर परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा योजना, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात येईल.**

**५.२ संबंधित परीक्षा ही वस्तुनिष्ठ स्वरुपाची २०० गुणांची असून तिचा कालावधी दोन तासाचा असेल. मुलाखत ५० गुणांची असून निवड होण्यासाठी मुलाखतीत किमान २१ गुण मिळविणे आवश्यक आहे. अंतिम गुणवत्ता यादी ही वस्तुनिष्ठ परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारीत राहील.**

**५.३** प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना त्या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या **www.mpsc.gov.in** वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक ८ जून २०१० रोजी निर्गमित केलेली महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमवली २०१० लागू आहे.

**९ . शुल्क :**

**९.१ अमागास - रु. २६५/-   ९.२ मागासवर्गीय - रु. १४०/-**

**१०. अर्ज करण्याची पध्दत –**

१०.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

१०.२ पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाइन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ५ फेब्रुवारी,२०१४ ते दिनांक २५ फेब्रुवारी,२०१४** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील

१०.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१०.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१०.५ आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

१०.६ www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

१०.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर ' Unpaid ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

११. लेखी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने लेखी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१२. लेखी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय लेखी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१३. आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१४. खेळाडू वर्गवारीसाठी दावा** करणा-**या उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक संचालनालयाकडून अर्ज करण्यापूर्वीच प्रमाणित करुन घेण्यात यावीत.**

**१५. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**१६. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २५ फेब्रुवारी, २०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**१७.चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २६ फेब्रुवारी,२०१४ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही..**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- ५ फेब्रुवारी, २०१४**

**राजन बा. खोत**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**